<table>
<tr><td rowspan="5">MHAU060022742022</td><td>दाखल दिनांक</td><td>:</td><td colspan="3">१०.१०.२०२२</td></tr>
<tr><td>नोंदणी दिनांक</td><td>:</td><td colspan="3">१०.१०.२०२२</td></tr>
<tr><td>निकाल दिनांक</td><td>:</td><td colspan="3">०२.०१.२०२५</td></tr>
<tr><td rowspan="2">कालावधी</td><td rowspan="2">:</td><td>वर्ष</td><td>महिने</td><td>दिवस</td></tr>
<tr><td>०२</td><td>०२</td><td>२३</td></tr>
</table>

**भाग -अ**

**कन्नड येथील न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग (न्यायालय क्र.३) यांचे न्यायालयात,**

**ता. कन्नड, जि. औरंगाबाद**

**(पिठासीन अधिकारी काटकर विजया एन.एस.)**

**समरी फौजदारी खटला क्र. १०४४/२०२२.**
**पिशोर पोलीस स्टेशन गुन्हा नं.३३६/२०२२.**
**निशाणी क्रमांक – /ब**

**महाराष्ट्र सरकार तर्फे**
**पोलीस स्टेशन पिशोर,**
**ता. कन्नड, जि. औरंगाबाद.** – **अभियोगपक्ष**
**उपस्थीती** **पी.आर.कुर्लेकर.**

**विरुध्द**

**१–समाधान उत्तम वाणी**
वय २९ वर्षे, धंदा – शेती,
रा. दहीगाव., ता.कन्नड, जि.औरंगाबाद.
**२– कृष्णा लाला वाणी**
वय – वर्षे, धंदा – शेती,
दोघे रा. दहीगाव., ता.कन्नड, जि.औरंगाबाद. – **आरोपी**
**उपस्थीती :–** **विधीज्ञ श्री. एस. आर. शिंदे**

## भाग – ब

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | दि.१९.०९.२०२२ |
| प्रथम खबरी अहवाल दाखल तारीख | दि.१९.०९.२०२२ |
| दोषारापपत्र दाखल तारीख | दि. ०३.१०.२०२२ |
| पुरावा सुरु होण्याची तारीख | दि.०९.०२.२०२४ |
| न्यायनिर्णयसाठी राखीव ठेवण्याची तारीख | दि.०२.०१.२०२५ |
| न्यायनिर्णय | दि.०२.०१.२०२५ |
| शिक्षेबाबत तपशिल | आरोपीला निर्दोष सोडले. |

## आरोपीचे तपशिल.

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटक केल्याची तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | कोणत्या गुन्ह्या अंतर्गत | दोषी अथवा निर्दोष | शिक्षे बाबत तपशिल | स्थान बद्दल वजावाट |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | समाधान उत्तम वाणी | सीआरपीसी कलम ४१–अ प्रमाणे नोटीस देण्यात आली. | ०६.०४.२०२३ | महाराष्ट्र दारु प्रतिबंध कायदा १९४९, ६५(ई) | निर्दोष | निरंक | निरंक |
| २. | कृष्णा लाला वाणी | सीआरपीसी कलम ४१–अ प्रमाणे नोटीस देण्यात आली. | ०६.०४.२०२३ | महाराष्ट्र दारु प्रतिबंध कायदा १९४९, ६५(ई) | निर्दोष | निरंक | निरंक |

## भाग–क

## अभियोगपक्षातर्फे पुरावा

| अनु. क्र. | साक्षीदाराचे नाव | नि.क्र. | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १. | माधव पुंजाराम जरारे | १८ | साक्षीदार |

**आरोपीतर्फे पुरावा – काही नाही.**

**अभियोगपक्षातर्फे अथवा आरोपीतर्फे दस्तऐवज.**

| अनु. क्र. | नि.क्र. | तपशिल. |
|---|---|---|
| १. | २० | जप्ती पंचनामा |
| २. | १९ | फिर्याद |
| ४. | २२ | रासायनिक विश्लेषणाचे पत्र |

**भाग –ड**

**मटेरिअल ऑब्जेट.**

| अनु. क्र. | मटेरिअल ऑब्जेट | तपशिल. |
|---|---|---|
| १. | देशी दारु. | एका पिशवीमध्ये देशी दारु संजीवनी संत्रा असे कागदी लेबल असलेलेल्या १८० मि.ली. क्षमतेच्या काचेच्या ४८ सिलबंद बाटल्या ज्याची एकुण विक्री किंमत ४३२०/– रुपये. |
| २. | मोटरसायकल | एक काळया रंगाची होन्डा कंपनीची शाईन मोटर सायकल क्र. एमएच-२०-एफएन ३५१६ लाल सिल्हर रंगाची पटटे असलेली जुनी वापरती मोटरसायकल. |

**न्यायनिर्णय**

**(दिनांक ०२.०१.२०२५ रोजी अधिघोषित )**

आरोपी महाराष्ट्र दारु प्रतिबंधक कायदा, १९४९ चे कलम ६५ (ई) अन्वये दोषारोप संबंधीच्या संपरिक्षेस सामोरे जात आहे.

**अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत –**

**०२.** अभियोग पक्षाचे कथनाप्रमाणे, दिनांक १९.०९.२०२२ रोजी १६.३६ वाजता फिर्यादी व सोबत सपोनि से शिंदे मॅडम व पोना/८९० डकले असे पेट्रोलिंग कामी शासकिय वाहनाने पोलिस ठाणे पिशोर हददीत रवाना झाले. ते नाचनवेल चौफुली येथे

असताना त्यांना त्यांचे गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, ईसम नामे समाधान उत्तम वाणी व कृष्णा लाला वाणी हे देशी दारुची चोरटी विक्री करण्यासाठी नाचणवेल येथुन मोटार सायकलवर दहेगाव येथे जाणार आहे. अशी खात्रीलायक बातमी मिळाल्याने ते पंचनाम्यातील नमुद दोन पंच यांना बोलावुन बातमीचा आशय कळवून त्यांना रेड कामी सोबत राहाणे बाबत विनंती केली असता त्यांनी सोबत राहाण्याचे मान्य केल्याने दोन पंचाना सोबत घेउन ते पोलिस व पंच असे नाचणवेल चौफुली सिल्लोड रोडवर आडोशाला दबा धरुन थांबलो असता एक ईसम नाचणवेल गावाकडुन मोटार सायकलवर मधोमध एक बॉक्स ठेउन येताना दिसले. त्यास त्यांनी हाताच्या ईशा–याने १८.१० वाजता थांबवुननाव गाव विचारले असता त्यांनी त्याचे नाव समाधान उत्तम वाणी व कृष्णालाला वाणी असे सांगीतले. त्यानंतर मोटार सायकलवरच्या बॉक्सची पाहणी केली असता एका खाकी रंगाच्या बॉक्समध्ये देशी दारु संजिवनी संत्रा असे कागदी लेबल असलेल्या १८० एम.एल. च्या काचेच्या एकुण ४८ सिलबंद बाटल्या एकुण विक्री किंमत ४३२०/– रुपये ताब्यात व कब्जात बाळगतांना मिळुन आले. तसेच एक काळया रंगाची शाहीन गाडी होंडा कंपनीची लाल व सिल्वर पटटा असलेली मोटरसायकल क्र. एमएच२०एफएन ३५१६ नंबर असलेली गाडी मिळुन आली. त्यानंतर त्यांनी मिळुन आलेल्या प्रोहीबीशन गुन्ह्याचा मालाचा पंचासमक्ष सविस्तर जप्ती पंचनामा करुन मुद्देमाल जप्त करुन मिळालेल्या मुद्देमालापैकी ०१ बॉटल १८० एम.एल. देशी दारु संजीवनी संत्राची सिलबंद बाटली जागीच सिल लाख मोहर करुन त्यावर पंच व त्यांचे सहीचे कागदी लेबल लावुन सी.ए. तपासणी कामी वेगळी राखुन ठेवण्यात आली व बाकी सिल केलेला माल पंचांच्या सह्याच्या व त्यांचे सहीचे लेबल लावुन तपासाकामी ताब्यात घेतला.

**०३.** सदर फिर्यादीप्रमाणे तपासी अंमलदार यांनी घटनास्थळी जप्ती पंचनामा करुन तपासाच्या अनुषंगाने साक्षीदारांचे जबाब नोंदविले व सदर गुन्ह्याचा तपास पुर्ण करुन महाराष्ट्र दारु प्रतिबंधक कायदा, १९४९ चे कलम ६५–ई अन्वये आरोपी विरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

**०४.** आरोपी विरुध्द **निशाणी क्र.१४** वर महाराष्ट्र दारु प्रतिबंधक कायदा, १९४९ कलम ६५ (ई) नुसार गुन्हयाचा दोषारोप निश्चित केला. आरोपीने गुन्हा मान्य

नसल्याचे सांगुन संपरिक्षेची मागणी केली.

०५. प्रस्तुत प्रकरणामध्ये अभियोग पक्षातर्फे एक साक्षीदार तपासण्यात आले. **निशाणी क्र. १/क** वर आदेशान्वये अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. प्रस्तुत प्रकरणी आरोपीच्या विरुध्द पुरेसा पुरावा अभिलेखावर आल्यामुळे, त्यांचे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम **३१३ १–ब** अन्वयचे निवेदन **निशाणी क्र.२७ व २८** अन्वये नोंदवण्यात आलेले आहे. आरोपीने पुराव्यामध्ये खोटी केस केली असल्याचे कथन केले आहे.

**<u>विचाराधीन प्रश्न –</u>**

०६. प्रस्तुत प्रकरणातील दोषारोप व अभिलेखावरील दाखल पुरावा व कागदपत्रे तसेच दोन्ही वकिलांचा युक्तीवाद यांचा विचार करता खालील विचाराधीन प्रश्न उपस्थितीत होतात. सदर मुद्दयावरील निष्कर्ष खालीलप्रमाणे दिलेले आहेत.

| अ.क्र. | विचाराधीन प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक १९.०९.२०२२ रोजी १८.१० वाजेच्या सुमारास नाचणवेल चौफुली येथे आरोपीने विना परवाना बेकायदेशीर रित्या देशी दारु संजीवनी संत्रा असे कागदी लेबल असलेले १८० मि.ली. क्षमतेच्या काचेच्या ४८ सिलबंद बाटल्या ताब्यात व कब्जात बाळगुन चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने घेवुन जात असताना मिळुन आल्याचे अभियोग पक्ष शाबीत करतो काय? | नाही. |
| २. | काय आदेश ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करणेत आली. |

**का र ण मि मां सा.**

**विचाराधीन प्रश्न क्रमांक १ बाबत –**

०७. प्रामुख्याने या ठिकाणी नमुद करावे लागेल की, आरोपीवरील दोषारोप शाबीत करणेसाठी अभियोग पक्षास, आरोपीने विना परवाना बेकायदेशीर रित्या देशी दारु संजीवनी संत्रा असे कागदी लेबल असलेले १८० मि.ली. क्षमतेच्या काचेच्या ४८ सिलबंद बाटल्या ताब्यात व कब्जात बाळगुन चोरटी विक्री करताना मिळुन आला हा अंतर्भुत घटक सिध्द करावा लागेल.

०८. आरोपीवरील दोषारोप शाबीत करणेसाठी सरकार पक्षाने एक साक्षीदार तपासले आहे. साक्षीदार क्र.१ माधव पुंजाराम जरारे यांची साक्ष निशाणी क्र.१८ अन्वये नोंदविली आहे. दि.१९.०९.२०२२ रोजी ते पिशोर पोलीस ठाणे येथे सहाय्यक फौजदार म्हणुन कार्यरत होते. गु.र.क्र.३३६/२०२२, महिला पोलीस हेड कॉस्टेबल एस ए कांबळे ब.नं.१२७७ यांनी दाखल केला होता. तक्रार एल.टी. नागलोत यांनी दिली होती. सदर गुन्हयाचा तपास वरिष्ठांच्या तोंडी आदेशाने त्यांच्याकडे सुपुर्त करण्यात आला होता. तपास सुपुर्त करताना फिर्याद, पंचनामा, एफ. आय.आर., मुद्देमाल त्यांचेकडे देण्यात आले होते.

०९. त्यांना फिर्याद दाखवण्यात आली. त्यावर एल.टी. नागलोत यांची सही आहे. त्यांनी ती ओळखली आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१९** देण्यात आली होती. त्यांना जप्ती पंचनामा दाखवण्यात आला. जप्ती पंचनाम्यावर सुध्दा एल.टी. नागलोत यांची सही आहे. त्यांनी ती ओळखली आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२०** देण्यात आली होती. जप्त मुद्देमाल देशी दारु संजीवनी संत्राच्या १८० एम.एल.च्या ४८ बॉटल, एक खाकी बॉक्स व एक मोटरसायकल होत्या. जप्त मुद्देमाल त्यांनी मोहरील कडे घेवुन पावती फाडली. त्यांना पावती दाखवण्यात आली. ती तीच असून त्यावर त्यांची सही आहे. त्यांनी ती ओळखली आहे. त्यास **नि.क्र.२१** देण्यात आली होती.

१०. तपासादरम्यान साक्षीदारांचे जबाब नोंदवण्यात आले. जप्त मुद्देमालामधुन बाजुला काढण्यात आलेले नमुने रासायनिक विश्लेषणासाठी प्रयोगशाळेत पाठवण्यात आले. त्या संदर्भात त्यांनी पत्र पाठविले होते. त्यांना ते पत्र दाखवण्यात आले. ते तेच असून त्यावर त्यांची सही आहे. त्यांनी ती ओळखली आहे. त्यातील मजकुर खरा व

बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२२** देण्यात आली होती. त्यांनी स्वतः मुद्देमाल रासायनिक विश्लेषणासाठी प्रयोगशाळेत निघुन गेलो होतो. आरोपीला फौ.प्र.सं. १९७३ अंतर्गत ४१–अ ची नोटीस देण्यात आली होती.त्यांना ती नोटीस दाखवण्यात आली ती तीच असुन त्यावर त्यांची सही आहे. त्यांनी ती मी ओळखली आहे. त्यास **नि.क्र.२३** देण्यात आली होती. आरोपी विरुध्द सबळ पुरावा आढळुन आल्याने आरोपी विरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

**११.** उलटतपासात सदर साक्षीदाराला पंचनामा केला आहे का असे विचारले असता त्यांनी पंचनामा केलेला नाही तसेच घटना पाहीलेली नाही. तसेच जप्त मुददेमाल सिध्द करण्यासाठी रासायनिक विश्लेषनाचा अहवाल आवश्यक आहे असे विचारले असता रासायनिक विश्लेषनाचा अहवाल आलेला नाही असे सांगीतले. परंतु या प्रश्नानी प्रस्तुतच्या प्रकरणावर कोणताही परिणाम होत नाही. त्याचबरोबर आरोपीने विचारलेले इतर प्रश्न साक्षीदारने धुडकावून लावले आहे. त्यामुळे साक्षीदारांच्या साक्षीला कोणतीही बाधा निर्माण झाली नाही. त्यामुळे आरोपी विरुध्द सबळ पुरावा समोर येत आहे. विशेषताः छापा टाकण्याची प्रक्रिया, निशाणी क्र.१९ वरील फिर्याद, निशाणी २० वरील जप्ती पंचनामा आरोपी विरुध्द सिद्ध झाले आहे. त्यामुळे पोलीसांनी छापा टाकुन घटनास्थळी आरोपीची झडती घेवनु त्याच्याकडुन काही मुद्देमाल जप्त केल्याचे सिध्द होत आहे.

**१२.** महाराष्ट्र मद्य प्रतिबंधक कायदा, १९४९ कलम ६५–ई अनुसार एखाद्या व्यक्तीने प्रतिबंधक असलेले पदार्थ विक्री किंवा खरेदी किंवा स्वतःजवळ बाळगले तर त्यास कमीतकमी तीन वर्षाची कारावासाची शिक्षा व रु.२५०००/– चा दंड तसेच कारावासाची शिक्षा ५ वर्षापर्यत देता येऊ शकते व दंड रक्कम रु.५०,०००/– जाऊ शकते. या आरोपाचा मुळ गाभा हे प्रतिबंधक पदार्थ असून आरोपीकडून जप्त केलेले मुद्देमाल हे प्रतिबंधक पदार्थ हे दारु असल्याचे अभियोग पक्षास सिध्द करणे अपेक्षीत आहे. आरोपीवरील दोषारोप सिध्द करणेसाठी अभियोग पक्षाने रासायनिक विश्लेषणाचा अहवाल याकामी सादर केलेला नाही. त्यामुळे आरोपीच्या ताब्यातुन देशी दारु संजीवनी संत्राचे १८० मि.ली.क्षमतेच्या काचेच्या ४८ सिलबंद बाटल्या चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने घेवुन जात असतांना मिळुन आला हे सिध्द करीत नाही. तसेच, आरोपीविरुध्द लादण्यात आलेल्या आरोपांच्या सिध्दतेकरीता अभियोग पक्षाने **महाराष्ट्र मद्य प्रतिबंधक कायदा,**

**१९४९ कलम ६५–ई** नुसार परवानाबाबत कोणतेही पुरावा याकामी दाखल केले नाही. त्यामुळे, आरोपीकडे दारु बाळगण्याचा परवाना नव्हता अगर परवाना होता पण परवाण्याच्या अटीं व शर्तींचे पालन न करुन आरोपीने गुन्हा केला आहे, याबाबत, अभिलेखावर अभियोग पक्षाने तसेच, तपासी अधिका–याने कोणतीही सुस्पष्टता ठेवली नाही.

**१३.** अभियोग पक्षाने उपरोक्त सादर केलेल्या तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे गुणदोषावर अवलोकन करण्यापूर्वी प्रामुख्याने नमुद करावे लागेल की, प्रचलित न्याय तत्त्व प्रणालीनुसार आरोपीचे अपराधाचे कृत्य संशयाच्या पलिकडे शाबीत करण्याची सर्वस्वी जबाबदारी ही अभियोग पक्षाची असते. सदरची जबाबदारी अभियोग पक्षाने बचावातील त्रुटी, विसंगती व खोटेपणाचा आधार न घेता सबळ विश्वासार्ह तोंडी व कागदोपत्री पुराव्याने निःसंशयपणे व निर्विवादपणे सिध्द करावयाचे असते. अभियोग पक्ष स्वतः ही जबाबदारी पार पाडत नाही, तो पर्यंत आरोपी हा कायद्याच्या कक्षेत निष्पाप समजला जातो. आरोपीच्या बचावातील कमकुवतपणाचा फायदा अभियोग पक्षास घेता येणार नाही. सदर कामी अभियोग पक्षाने आरोपी विरुध्द लादण्यात आलेले आरोप निःसंशयपणे वरील चर्चेप्रमाणे सिध्द केले नाहीत, त्यामुळे विचाराधीन प्रश्न **क्रमांक १ चे** उत्तर **नकारार्थी** देत आहे.

## विचाराधीन प्रश्न क्रमांक २ बाबत –

**१४.** अभियोग पक्षास आरोपीने गुन्हा केलेचे सिध्द करता आलेले नाही. त्यामुळे आरोपी निर्दोष मुक्त होणेस पात्र आहे. सदर कामी जप्त केलेला मुद्देमाल म्हणजेच देशी दारु संजीवनी संत्रा असे कागदी लेबल असलेले १८० मि.ली.क्षमतेच्या काचेच्या ४८ सिलबंद बाटल्या अपिल कालावधीनंतर विल्हेवाट लावणे आवश्यक आहे. सबब, **विचाराधीन प्रश्न क्रमांक २** चे उत्तराकरीता मी खालील आदेश पारीत करते.

## आ दे श

१. **आरोपी क्र. १ समाधान उत्तम वाणी व आरोपी क्र. २ कृष्णा लाला वाणी** यांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम, २५५ (१) अन्वये महाराष्ट्र दारु प्रतिबंधक

कायदा, १९४९ चे कलम ६५ (ई) अन्वये शिक्षापात्र असलेल्या अपराधातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचा वैयक्तिक जातमुचलका व जामीनकतबा रद्द करण्यात येत आहे.

३. प्रस्तुत कामातील जप्त मुद्देमाल देशी दारु संजीवनी संत्राच्या १८० मि.ली.क्षमतेच्या काचेच्या एकुण ४८ बॉटल्या हया अपीलाचा कालावधी संपल्यानंतर अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, औरंगाबाद यांच्याकडे कायद्याप्रमाणे विल्हेवाट लावण्याकरीता पाठवाव्या.

४. प्रस्तुत कामातील मुद्देमाल पावतीमध्ये नमुद केल्याप्रमाणे जप्त मुद्देमाल देशी दारु संजीवनी संत्राच्या १८० मि.ली.क्षमतेच्या काचेच्या एकुण ४८ रिकाम्या बाटल्या (त्यातील द्रव्य ज्यास देशी दारु संजिवनी असे म्हणण्यात येत आहे) व एक पिशवी मुल्यहीन असल्यामुळे अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे विल्हेवाट लावण्यात यावी.

५. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम ४३७–अ प्रमाणे रक्कम रुपये १०,०००/– चा वैयक्तीक जात मुचलका सादर करावा.

६. जप्त मोटरसायकल एक काळया रंगाची शाहीन गाडी होंडा कंपनीची लाल व सिल्वर पट्टा असलेली मोटरसायकल क्र. एमएच२०एफएन ३५१६ बाबत कोणताही आदेश अभिलेखावर आढळुन आला नाही. परंतु अभिलेखावर त्या गाडीचे आर.सी बुकची छायांकित प्रत दाखल केली आहे व सदर गाडी आरोपी क्र. १ ची असल्याची दिसुन येत आहे. त्यामुळे सदर गाडी आरोपी क्र. १ ला देण्यात येत आहे.

७. आरोपीला इतर गुन्ह्यात आवश्यकता नसल्यास सोडण्यात येत आहे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करणेत आला.)

Digitally signed by VIJAYA NARAYANRAO KATKAR
Date: 2025.01.03 10:55:33 +0530

**दिनांक –०२.०१.२०२५**
**कन्नड.**

**(काटकर विजया एन. एस )**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.३) कन्नड.**

## <u>प्रमाणपत्र</u>

असे प्रमाणित करणेत येते की, पी.डी.एफ. निकालपत्र / आदेश या मधील सर्व मजकुर मुळ निकालपत्र / आदेशातील मजकुराप्रमाणे तंतोतंत खरा व बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | :- | आर. एस. टाकळकर |
| न्यायालयाचे नांव | :- | **काटकर विजया एन.एस.**<br>२ रे दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),<br>तथा प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कन्नड. |
| श्रुतलेखन दिल्याचा दिनांक | :- | ०२.०१.२०२५ |
| न्यायिक अधिकाऱ्यांनी निकालपत्रावर स्वाक्षरी केलेचा दिनांक | :- | ०२.०१.२०२५ |
| निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | :- | ०२.०१.२०२५ |
| निकालपत्रावर डिजीटल स्वाक्षरी केलेचा दिनांक | :- | ०२.०१.२०२५ |

---------------------------